जा.क्र./मनपा/आस्था-१/२०२४/ 223
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका
दिनांक :- 29 /०१/२०२४.

**कार्यालयीन परिपत्रक :-**

या परिपत्रकान्वये, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतील सर्व कार्यरत व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांचे नांवावर व कुटूंबातील व्यक्तींच्या नांवे महानगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या मालमत्तांवरील मालमत्ता कर व पाणीपट्टी कराचा भरणा दरवर्षी एप्रिल महिन्यात भरणे आवश्यक आहे. तसेच ज्या अधिकारी कर्मचारी यांनी सन २०२३-२४ या वर्षाचा मालमत्ता कर व पाणीपट्टी अद्याप भरणा केली नसेल, त्यांनी तो दिनांक १५/०२/२०२४ पावेतो भरुन त्याची पावती लेखा विभागात सादर करावी.

जे कार्यरत/सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी मालमत्ता कर व पाणीपट्टी कराचा भरणा विहित कालावधीत करणार नाहीत, त्यांचे फेब्रुवारी २०२४ या महिन्याचे वेतन/निवृत्तीवेतन अदा केले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

आयुक्त तथा प्रशासक
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

प्रति,

सर्व विभाग प्रमुख/शाखा प्रमुख, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांनी सदरचे परिपत्रक त्यांचे अधिनस्त सर्व नियमित अधिकारी व कर्मचाऱ्यांचे निदर्शनास आणून द्यावे.